ARTHA
( Fortnightly )
Poona 4
Tel. 55627

# अर्थ

LICENCED TO POST
WITHOUT
PREPAYMENT
Reg. No. MH. 80. Licence No. 175

वर्ष ३७ | पुणे, बुधवार, १५ सप्टेंबर, १९७१ | अंक १८



## दोन व्यवसायनिष्ठ आदर्श ग्रंथपाल

### श्री. मार्शल व श्री. पारखी

मुंबई विद्यापीठाचे ग्रंथपाल आणि ग्रंथपालन शाखेचे प्रमुख श्री. दारा नशरवानजी मार्शल हे सेवानिवृत्त होत आहेत सेवा-वृत्तीने वाचकांच्या सर्व गरजा भागविण्याची त्यांची तळमळ आदर्श होती आणि त्यांच्याशी संबंध येणारे त्यामुळे प्रभावित होऊन त्यांचे अनुकरण करण्यास उद्युक्त होत असत. वेगवेगळे संशोधक त्यांच्याकडे असंख्य विषयांची माहिती मिळविण्यासाठी जात; आणि ते ती तत्परतेने देत असत. त्यांच्या आयुष्याचे ध्येय, "ज्ञानार्जनासाठी सतत सिद्ध असणे आणि ज्ञान इतरांना देण्यात नेहमी आनंद मानणे" असे होते आणि ह्या ध्येयाप्रमाणे ते वागत असत. अर्थशास्त्राची पदव्युत्तर परीक्षा देऊन ते १९३१ मध्ये मुंबई विद्यापीठाचे उपसचिव झाले. त्यांनी प्रत्येक परीक्षेत पहिला वर्ग मिळवून पारितोषिके मिळविलेली होती. १९४७ मध्ये त्यांनी उपसचिवाचे पद सोडून विद्यापीठाच्या ग्रंथपालाची जागा पत्करली; ती त्यांच्या स्वभावाला आणि व्यासंगाला अधिक पोषक होती. भारतातील अग्रेसर निष्ठावंत ग्रंथपाल असा लौकिक त्यांनी संपादन केला; त्यांना ग्रंथालयातील जवळ जवळ प्रत्येक ग्रंथ परिचयाचा होता, त्यांचे वाचन प्रचंड होते, ज्ञानसंग्रहही मोठा होता.

प्रतिकूल परिस्थितीशी आमरण झगडून, ध्येयावरील निष्ठा ढळू न देता जन्मभर ग्रंथालय शास्त्राची सेवा करणारे दुसरे आदर्श ग्रंथपाल म्हणजे कै. र. शं. पारखी हे होत. प्रतिकूल कौटुंबिक परिस्थितीमुळे कॉलेजचे शिक्षणही घेऊ न शकलेल्या कै. अप्पासाहेब पारखींनी मराठीप्रमाणे इंग्रजी भाषेतही जेवढे प्रचंड ग्रंथलेखन केले, तेवढे महाराष्ट्रातील सर्व ग्रंथपालांनी मिळूनही केलेले नाही. त्यांचे ग्रंथ परदेशातही मान्यता पावले आहेत. पद्मभूषण डॉ. रंगनाथन ह्या ग्रंथपाल महर्षींचे कै. अप्पासाहेब हे सत्शिष्य होत. त्यांची विद्वत्ता ओळखून डॉ. रंगनाथननी त्यांना बंगलोर येथील स्वतःच्या अखिल भारतीय संस्थेत शिकवण्यासाठी पाचारण केले. पुण्यातील फर्ग्युसन कॉलेजात त्यांचे मुख्य कार्य झाले, परंतु गोखले इन्स्टिटयूटसारख्या कित्येक संस्थांनीही त्यांचे तज्ज्ञ सहकार्य मुद्दाम घेतले. कै. अप्पासाहेबांनी प्राध्यापकांच्या उपयोगी पडणारे ग्रंथपालन विषयावर मौलिक ग्रंथ लिहिले, परंतु त्यांचे त्यांच्या कर्मभूमीत मात्र व्हावे तेवढे चीज होऊ शकले नाही, ह्याबद्दल त्यांच्या शिष्यांना नेहमीच हळहळ वाटत रहाते. कै. अप्पासाहेबांच्या स्मरणार्थ पुणे विद्यापीठाच्या ग्रंथपालनाच्या पदवी परीक्षेत वर्गीकरण विषयात पहिला येणाऱ्या विद्यार्थ्याला 'पारखी पारितोषिक' ठेवण्यांत आले आहे. त्याचा समारंभ पुणे येथे नुकताच पार पडला. कै. अप्पासाहेबांच्या शिष्यांनी जमविलेल्या रकमेच्या व्याजातून हे पारितोषिक दरसाल दिले जाते.

---


**सरदारगृह**

**मुंबईत राहण्याची व भोजनाची उत्तम सोय.**

**मंगलकार्ये व मेजवान्या यांसाठी सोईस्कर ठिकाण.**

— आमची वैशिष्ट्ये —

* हीरकोत्सवानिमित्त अद्ययावत् पद्धतीचे भोजनगृह व अनेक प्रकारच्या सुखसोई.
* टिळक जन्मशताब्दीदिनी लोकमान्यांचे सरदारगृहात केलेले स्मारक.

फोन नं. :- ३८३३७ ] सरदारगृह प्रा. लि. [ तार—सरदारगृह
क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई २.






**नाण्याला तीन बाजू असतात...**

दोन नेहमीच्याच आणि तिसरी बाजू परीघ (जाडी)
युनायटेड वेस्टर्न बँकेत रक्कम गुंतविल्याने नाण्याचा परीघ वाढतो म्हणजेच रकमेत वाढ होते. आकर्षक व्याज दराच्या, गरजेनरूप विविध ठेव योजना.

**दि युनायटेड वेस्टर्न बँक लि.**

मुख्य कचेरी: चिरमुले निकेतन, राजपथ, सातारा.
स्थापना: १९३६ महाराष्ट्रांत सर्वत्र शाखा शेड्युल्ड बँक
**वेस्टर्न इंडिया ट्रस्टी अँड एक्झीक्युटर कंपनी लि.**
बँकेच्या या संलग्न संस्थेमार्फत विश्वस्त निधी व व्यवस्थापनाची कामे केली जातात

# ☆ अर्थ ☆

बुधवार, १५ सप्टेंबर, १९७१



संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे

*"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र.*


## पाकिस्तानला शस्त्र पुरविण्यावर कडक टीका

अमेरिकेचे भारतामधील माजी वकील मि. चेस्टर बौल्स ह्यांनी अलीकडे एक पत्रक काढून अमेरिकेचे अध्यक्ष मि. निक्सन ह्यांनी पाकिस्तानला शस्त्रास्त्रांचा पुरवठा चालू ठेवल्याबद्दल कडक टीका केली आहे. ते म्हणतात की अमेरिकन सरकारने पाकिस्तानचा शस्त्रपुरवठा बंद केला नाही ही दुःखाची गोष्ट आहे. जागतिक बँकेने अन्न आणि औषधे सोडून पाकिस्तानला दिली जाणारी सर्व मदत बंद करावी अशी सूचना केली आहे. परंतु अमेरिकेच्या सरकारने तीही मानली नाही. पूर्व पाकिस्तानने निवडून दिलेले प्रतिनिधी आणि पाकिस्तान सरकार ह्यांच्यांत राजकीय तडजोड घडून येईपर्यंत सर्व मदत थांबविण्यात यावी असे जागतिक बँकेचे मत आहे. अमेरिकेच्या ह्या कृतीमुळे भारतामधील अमेरिकेच्या मित्रांनाही फार राग आला, ह्यात काही आश्चर्य मानण्यासारखे नाही. भारतापुढील अडचणींची अमेरिकन वृत्तपत्रांना, काँग्रेसला आणि लोकांना अधिक चांगली कल्पना येऊ लागली आहे. अशा मोक्याच्या वेळी अमेरिकन सरकारने भारताबद्दल गैरसमजुतीचे धोरण स्वीकारावे ही दुर्दैवी घटना म्हणावी लागेल. अमेरिकेच्या प्रतिनिधीगृहाने परदेशांना मदत करण्याच्या कार्यक्रमात दुरुस्ती सुचवून पाकिस्तानला देण्यात यावयाची सर्व आर्थिक व लष्करी मदत बंद करावी अशी शिफारस केली आहे. लवकरच अमेरिकेच्या सिनेट सभागृहाची बैठक भरणार आहे. त्यातही प्रतिनिधीगृहाची सूचना उचलून धरण्यात येईल ह्यांत शंका नाही.

## वेतनातील तफावतीकडे दुर्लक्ष करून चालणार नाही

वेतनात वाढ करून घेण्यासाठी संपावर जाण्याचे हत्यार आता नेहमीच वापरले जाऊ लागले आहे. पुन्हा संप हा केवळ शारीरिक श्रम करणाऱ्यांनीच करावा असाही समज राहिलेला नाही. विवक्षित संप न्याय्य अगर अन्याय्य आहे, हे अर्थातच तपशिलात शिरल्याशिवाय कळू शकत नाही. परंतु संपाच्या भूमिकेमागे वेतनातील तफावत दडून असते हे मात्र खरे. दिल्ली येथे भरविण्यात आलेल्या एका परिसंवादात नियोजनमंत्री श्री. सुब्रह्मण्यम् ह्यांनी सार्वजनिक क्षेत्रातील वेतनाच्या तफावतीवर प्रकाश टाकला आहे. सार्वजनिक विभागातील संघटनात जास्तीत जास्त पगार मिळविणारा मॅनेजर आणि सर्वांत कमी वेतन असलेला नोकर ह्यांच्या पगारात २५ पट फरक असतो अशी माहिती त्यांनी सांगितली. ते म्हणाले की, ही तफावत फार आहे. त्याचप्रमाणे सार्वजनिक विभाग आणि खाजगी विभाग ह्यांच्यांतील वेतनाची तफावतही खूप आहे. समाजाच्या इतर थरांवर ह्या वस्तुस्थितीचा काय परिणाम होतो त्याकडे दुर्लक्ष करून भागणार नाही. शिवाय समाजवादी धोरणाशी ही तफावत कितपत सुसंगत आहे ह्याचाही विचार करावयास हवा. सार्वजनिक मालकीच्या विभागात ६ लाखांवर माणसे गुंतलेली असून त्यांच्या वेतनाचा वार्षिक खर्च ३०० कोटी रुपयांच्या घरात आहे. म्हणजे ह्या विभागात काम करणाऱ्या माणसाचे सरासरी वार्षिक उत्पन्न ५ हजार रुपये पडते. हे उत्पन्न देशातील दरडोई उत्पन्नाच्या १० पटीने अधिक आहे.

---

## भारतातील वीज सर्वांत महाग

उद्योगधंदे चालविण्यासाठी कोळसा, वीज अगर तेल ह्यांच्या साह्याने शक्ती निर्माण करावी लागते. अलीकडे अणुशक्तीच्या साह्याने निर्माण करण्यात येणाऱ्या विजेची भर त्यात पडली आहे. परंतु यंत्रसामग्री चालविण्यासाठी लागणारी ही शक्ती महाग पडत असेल तर त्याचा परिणाम मालाच्या उत्पादनाचा खर्च वाढण्यात अपरिहार्यपणे होतो. भारतामधील औद्योगिक शक्तीच्या उत्पादनाची पाहणी करण्यात आली असता सरकारी अभ्यासकांना असे आढळून आले की इतर बहुतेक देशांच्यामानाने येथील विजेचे उत्पादन महाग पडते. जलप्रपाताच्या साह्याने वीज उत्पन्न करण्याचा भारतामधील दर किलोवॅटमागे खर्च १·५ ते ४ पैसे इतका आहे. अमेरिकेमध्ये हा खर्च १·५ पैसे आहे तर रशिआत ०·८ पैसे इतका आहे. कोळशाच्या इंधनाचा वापर करून वीज निर्माण करण्याचा भारतामधील खर्च दर किलोवॅटमागे ६ पासून ११ पैसे इतका पडतो. हाच खर्च अमेरिकेत ४·५ पैसे आणि ब्रिटनमध्ये ५·२५ पैसे इतका येतो. भारतात दूर अंतरावर असलेल्या औष्णिक वीजकेंद्रामुळे खर्चात इतर देशांच्या मानाने अधिक वाढ होते. अणुशक्तिनिर्मित वीजनिर्मितीचा भारतामधील खर्च दर किलोवॅटमागे ५·६ पैसे इतका आहे. हाच खर्च अमेरिकेत ४·१७ पैसे आणि ब्रिटनमध्ये ४·८ पैसे इतका आहे. पुढारलेल्या देशात वीजकारखान्याची यंत्रसामग्री सापेक्षतेने स्वस्त असते. शिवाय कारखाने मोठे असतात आणि ते चालविण्याचे तंत्र अद्ययावत असते.

---

## सांगली बँक लिमिटेडचे नवे चेअरमन
## आणि चीफ एक्झिक्युटिव्ह
## श्री. वा. त्रिं. कोरके

सांगली बँक लिमिटेडला जे नवे तज्ज्ञ चेअरमन आणि मुख्याधिकारी लाभले आहेत, त्यांच्या गाठीशी बँकिंग व्यवसायाच्या प्रदीर्घ, निष्ठावत सेवेचा बहुमोल अनुभव आहे. पाटणा विद्यापीठाची एम्. एससी. ची पदवी त्यांनी १९३१ मध्ये घेतली, तेव्हापासून ते व्यावसायीक बँकर म्हणूनच काम करीत आहेत. हुशार विद्यार्थी म्हणूनही ते चमकले आहेत. इंडियन इन्स्टिटयूट ऑफ बँकर्स, मुंबई, च्या सी ए आय



आय बी परीक्षेत १९३३ मध्ये पहिला अनुक्रम मिळविल्याबद्दल त्यांना दि सर नॉर्मन मरे सुवर्णपदक देण्यात आले होते. परदेशी हुंडणावळ ह्या विषयात त्यांनी उल्लेखनीय प्रावीण्यपद मिळविले. पुढील वर्षी ते इन्स्टिटयूट ऑफ बँकर्सची सी ए आय बी ही परीक्षा परदेशी हुंडणावळ ह्या विषयात प्रावीण्यपद मिळवून उत्तीर्ण झाले.

आपल्या बँकिंगच्या आयुष्यक्रमाला त्यांनी १९३१ साली सेंट्रल बँक ऑफ इंडिया लि. मध्ये उमेदवार म्हणून प्रारंभ केला आणि तेथून ते ग्रुप मॅनेजर ह्या स्थानापर्यंत पोचले; स्वतःच्या उत्कर्षाला अधिक वाव मिळावा म्हणून त्यांनी ह्या जागेवरून बँकेच्या नोकरीचा राजीनामा दिला. सेंट्रल बँक ऑफ इंडिया लि. मध्ये असताना ते लंडनमध्ये मिडलंड बँकेत 'ट्रेनी' म्हणून एक वर्ष होते आणि नंतर सेंट्रल एक्सचेंज बँक ऑफ इंडिया लि., लंडन, मध्ये प्रथम अकौंटंट आणि नंतर संचालक म्हणून त्यांनी काम केले.

१९४३ नंतर सुमारे पाच वर्षे श्री. कोरके ह्यांनी युनायटेड कमर्शिअल बँक लि. मध्ये शाखा तपासणी खात्याचे नियंत्रक, मध्यप्रांत वऱ्हाड विभागाचे ग्रुप मॅनेजर आणि पश्चिम शाखा विभागाचे इन्स्पेक्टर, अशा जागेवर कामे केली आणि बँकेच्या व्यवस्थापनाशी त्यांचे तात्त्विक मतभेद झाल्यामुळे ते बँकेतून निवृत्त झाले. १९४९ ते १९६२ ह्या काळात ते रिझर्व्ह बँकेत बँकिंग ऑफिसर आणि बँकिंग ऑपरेशन्सच्या खात्याच्या प्रादेशिक कचेऱ्यांचे डेप्युटी चीफ ऑफिसर होते. रिझर्व्ह बँकेत असतानाच त्यांची बँक अवार्ड कमिशनच्या सेक्रेटरीचे जागी नेमणूक होण्यासाठी त्यांना बँकेने नित्याच्या कामातून मोकळीक दिली होती.

१९६२ मध्ये श्री. कोरके ह्यांची बँक ऑफ बरोडा लि. मध्ये शाखांचे प्रमुख इन्स्पेक्टर म्हणून नेमणूक झाली. त्या जागेवरून ते नोव्हेंबर १९६७ मध्ये नोकरीच्या कराराची मुदत संपल्यावर निवृत्त झाले. डिसेंबर, १९६७ ते मार्च, १९७१ अखेर ते सिंडिकेट बँकेचे मॅनेजर आणि नंतर फॉरिन बिझिनेसचे नियंत्रक होते; बँकेच्या फॉरिन एक्सचेंज विभागाची पुनर्घटना पुरी केल्यावर सांगली बँकेची सूत्रे हाती घेण्यासाठी त्यांनी सिंडिकेट बँक सोडली.

रिझर्व्ह बँकेत असताना, श्री. कोरके ह्यांनी बँकेचे नियुक्त प्रतिनिधी म्हणून कित्येक प्रसंगी रिझर्व्ह बँकेचे प्रतिनिधित्व केले. त्यात स्टेट बँक ऑफ त्रावणकोर, म्हैसूर, बिकानेर आणि जयपूर; केरळ आणि जम्मू काश्मीरच्या स्टेट फिनॅन्शिअल कॉर्पोरेशन्स, बँकिंग आणि जंगम मालमत्तेबाबत भारत-पाकिस्तान करारान्वये नेमलेल्या कृती समित्या, इत्यादी वरील प्रतिनिधित्वाचा समावेश आहे.

अशा रीतीने, बँकिंगच्या विविध क्षेत्रांत विविध स्थरांवर विविध ठिकाणी जबाबदारीची कामे करून अनुभव मिळविलेला तज्ज्ञ आणि कार्यक्षम बँकर सांगली बँक लि. ची धुरा वाहण्यास मिळाला आहे, ही अत्यंत स्वागतार्ह घटना आहे. नेतृत्वाच्या ह्या नव्या जागीही श्री. कोरके ह्यांचा उत्कृष्ट ठसा उमटून सांगली बँक लि. चा उत्कर्ष होत राहील, ह्यात संशय नाही.

---

## स्वस्तिकची उल्लेखनीय प्रगती

स्वस्तिक रबर प्रॉडक्ट्स लि. ने १९७१ च्या पहिल्या आठ महिन्यांत उल्लेखनीय प्रगती केली आहे. ऑगस्ट, १९७१ अखेरच्या आठ महिन्यांत कंपनीची विक्री १९७० च्या तत्सम मुदतीमधील विक्रीपेक्षा २५% नी अधिक झाली. ती ३·४० कोटी रुपयांवरून ४·२७ कोटी रुपयांवर गेली. कंपनीच्या एकूण उत्पादनापैकी पादत्राणांचे उत्पादन ४५% पेक्षा अधिक आहे. कंपनीकडे ३·३० कोटी रुपयांच्या मागण्या हाताशी असून त्यापैकी १·३४ कोटी रुपयांच्या मागण्या परदेशांच्या आहेत. हाताशी असलेल्या मागण्या आणि गेल्या आठ महिन्यांतील प्रगती ह्यावरून १९७१ मधील उत्पादन आणि विक्री १९७० पेक्षा खूपच अधिक होईल, असा कंपनीस विश्वास वाटतो. कंपनीची लाभक्षमताही त्यामुळे वाढेल.

### विलिनीकरण मंजुरी अर्जाची सुनावणी

स्वस्तिक आणि बँक ऑफ महाराष्ट्र लि. ह्यांच्या विलिनीकरणास मंजुरी मागणारा अर्ज मुंबई हायकोर्टापुढे आहे. त्या अर्जाच्या सुनावणीची पुढील तारीख ह्या महिन्याच्या दुसऱ्या पंधरवड्यात असून हायकोर्टाची मंजुरी मिळण्यास आता फार अवधी लागणार नाही, असे समजते. मंजुरीनंतर स्वस्तिकला सुमारे २ कोटी रुपये शेअर्स व डिबेंचर्स ह्यांच्या स्वरूपात मिळतील असा अंदाज आहे.

## लोकसंख्येच्या वाढीला आत्मघाताचा पर्याय

लोकसंख्येच्या बेलगाम वाढीमुळे सर्व मनुष्य जातीवर कोसळू पाहणाऱ्या अरिष्टासंबंधी शास्त्रज्ञ मधून मधून इशारे देत असतात. असा एक इशारा ब्रिटनमधील लीडस् विद्यापीठातील एका शास्त्रज्ञाने दिला आहे. त्याचे म्हणणे असे आहे की, सुमारे एका शतकाच्या अवधीत जगाची लोकसंख्या ३ हजार कोटींच्या घरात जाईल सध्या असलेल्या लोकसंख्येची दुप्पट तीनदा झाली की पृथ्वीवरील लोकांची संख्या पराकोटीला पोहोचेल. परंतु अन्नपदार्थांच्या उत्पादनात अशी दुपटीची वाढ फार झाले तर तीनदाच होऊ शकेल, आणि तीही केवळ तात्त्विक दृष्ट्या विचार केला तरच-शक्य दिसते; प्रत्यक्ष होईल की नाही हा प्रश्नच आहे. इतकी बिकट अवस्था झाल्यावर माणसास मोठ्या प्रमाणावर सामुदायिक आत्मघात करून घेण्याचाच काय तो पर्याय शिल्लक राहील. कारण दरम्यान माणसाने जगाची उरली-सुरली उत्पादनक्षमता नाहीशी केलेली असेल ह्या संदर्भात लेमिंग ह्या प्राण्याचे उदाहरण लक्षात घेण्यासारखे आहे. ह्या प्राण्याची फाजील उत्पत्ती झाली की त्यांच्यावर दाटिवाटीने राहण्याचा प्रसंग येतो. त्यांना ते सहन होत नाही आणि मग त्यांतील हजारो प्राणी आत्मघात करून घेतात. प्रयोगशाळेतेही असे उदाहरण सापडते. एकंदरीने माणूस हा एक अतिशय उपद्रवी प्राणी आहे. कारण तो पुन्हा कधीही निर्माण करता येणार नाहीत अशी नैसर्गिक साधने नष्ट करीत आहे आणि त्याचबरोबर असे काही तयार करीत आहे की त्यांचा नाश होतच नाही.

---

## सार्वजनिक विभागातील अधिकारी कंटाळले!

भारतामधील अर्थव्यवस्था संमिश्र आहे. म्हणजे तीत खाजगी मालकीचा व सार्वजनिक मालकीचा असे दोन विभाग आहेत. सार्वजनिक मालकीच्या आर्थिक व इतर संघटना स्वातंत्र्यप्राप्ती-नंतरच्या काळात स्थापन झालेल्या आहेत. अर्थातच ह्या संघटनांतून जबाबदारीच्या जागांवर काम करण्यास लागणारा अधिकारीवर्ग सरकारला पुरवावा लागला. सार्वजनिक मालकीच्या विभागात सुमारे ५० वरिष्ठ सरकारी अधिकारी सध्या काम करीत आहेत. त्यांच्या पगाराची श्रेणी मासिक २,५०० रुपयांपासून ३,००० रुपयांपर्यंत आहेत. ह्या अधिकाऱ्यांना सरकारने असे कळविले होते की त्यांची सध्याच्याच जागांवर काम करण्याची तयारी आहे किंवा त्यांना आपल्या पूर्वीच्या खात्यांतील जागांवर रुजू व्हावयाचे आहे हे त्यांनी ३१ ऑगस्ट १९७१ अखेर ठरवून त्याप्रमाणे सरकारला कळवावे. आता अशी वार्ता आली आहे की बहुतेक सर्व वरिष्ठ अधिकाऱ्यांनी आपल्या पूर्वीच्या जागांवर परत जाण्याची इच्छा प्रदर्शित केली आहे. ह्या अधिकाऱ्यांखेरीज त्यापेक्षा खालच्या जागांवर काम करणारे १,००० सनदी नोकर सार्वजनिक मालकीच्या संघटनांतून आहेत. त्यांनीही आपला निर्णय फेब्रुवारी, १९७२ अखेर कळवावयाचा आहे. सनदी नोकर कोणत्या कारणाने आपल्या पहिल्या जागी परत जाण्यास उत्सुक आहेत ते कळण्यास मार्ग नाही. परंतु वरिष्ठ अधिकारी अशा रीतीने एकदम पूर्वीच्या नोकऱ्यांवर गेल्यास सार्वजनिक विभाग विस्कळीत होण्याचा धोका आहे.

---

## पाश्चात्य राष्ट्रांच्या दडपणाचा परिणाम?

पूर्व बंगालच्या लष्करी प्रशासकाच्या व गव्हर्नरच्या जागेवरून टिक्काखान ह्यांना परत बोलविण्यात आले असून त्यांच्या जागी मुलकी गव्हर्नरची नेमणूक करण्यात आली आहे. टिक्काखान ह्यांना माघारी बोलावणे प्रे. याह्याखान ह्यांना पाश्चात्य राष्ट्रांच्या दडपणामुळे भाग पडले असावे असा राजकीय निरीक्षकांचा अंदाज आहे. अमेरिकेच्या प्रवक्त्यांनी बांगला देशाच्या प्रश्ना-संबंधी खाजगी रीतीने प्रयत्न चालू असल्याचे अनेकदा जाहीर केलेले आहे. बांगला देशाचे पुढारी शेख मुजीबुर रहिमान ह्यांच्याशी वाटाघाटी कराव्या, अशाही गर्भित सूचना प्रे. याह्याखान ह्यांना देण्यात आल्या होत्या. बांगला देशात लष्कराविरुद्ध लढणाऱ्या गनिमांना भारत मदत देतो असा प्रचार पाकिस्तान करीत आहे. टिक्काखान ह्यांना परत बोलावण्याचे धोरण पाकिस्तानच्या नव्या दिशेने पडणाऱ्या पावलांचे निदर्शक आहे असा अर्थ पाकिस्तानची मित्रराष्ट्रे लावण्याचा संभव आहे. भारताने आता गनिमांना देण्यात येणारी मदत बंद करावी असे दडपण येण्याचीही शक्यता आहे. दरम्यान बांगला देशातील गनिमांचा विरोध चालूच आहे. मात्र त्यात सुसूत्रता असल्याचे दिसत नाही. पाकिस्तानची आर्थिक परिस्थिती कोसळलेली दिसत नाही ह्याला दोन कारणे आहेत. एक तर काही अमेरिकन बँकांनी पाकिस्तानला कर्जपुरठा केला. दुसरे असे की पाकिस्तान आपल्या कापडाला, खेळण्याच्या सामानाला व इतर मालाला परदेशी बाजारपेठा मिळविण्यात यशस्वी झाला आहे.

---

## मोठी विमाने चीनला पाहिजेत

भारताने अमेरिकेकडून घेतलेल्या जंबो जेट विमानासारखी मोठी वाहतुकीची विमाने मिळविण्याच्या प्रयत्न चीन करीत आहे. ब्रिटन व फ्रान्स संयुक्तपणे तयार करीत असलेल्या 'कंकॉर्ड' ह्या स्वनातीत विमानाबद्दल चीनकडून आस्था दाखविण्यात येत आहे. दोन्ही देशांच्या विमान तज्ज्ञांनी चीनला भेट द्यावी असे आमंत्रणही देण्यात आले आहे. ते स्वीकारून तज्ज्ञांचे एक मंडळ लवकरच पेकिंगला जाणार आहे. गेल्या वर्षी ब्रिटनमध्ये भरविण्यात आलेल्या विमान प्रदर्शनात चीनने आपली आस्था प्रथम प्रगट केली होती. मोठी स्वनातीत विमाने घेण्यासाठी चीनला कोट्यावधी रुपये खर्च येणार आहे.

---


## अपुऱ्या माहितीमुळे विम्याचा हक्क फेटाळला


दिल्ली येथील हायकोर्टात आयुर्विमा कॉर्पोरेशनने दिलेल्या एका पॉलिसीच्या आधाराने ६५ हजार रुपयांची मागणी करण्यात आली होती. विमेदाराने अपुरी माहिती दिल्यामुळे त्याच्या नॉमिनीला ही रक्कम देण्याची जबाबदारी कॉर्पोरेशनवर राहात नाही असा निकाल हायकोर्टाने दिला आहे. दाव्याची हकीकत अशी आहे. एका विमेदाराने कॉर्पोरेशनकडून ५ विमापॉलिसी घेतलेल्या होत्या. त्यावरील काही हप्ते विमेदाराने भरलेले नव्हते. असे असता त्याने २८ सप्टेंबर, १९६३ रोजी ३५ हजारांचा नवा विमा उतरविला. ह्या पॉलिसीवरील दोन वर्षांचे हप्ते त्याने भरले. नंतर २८ सप्टेंबर, १९६४ रोजी त्याने ३० हजारांचा आणखी एक विमा उतरविला. ह्या दोन्ही पॉलिसी २८ सप्टेंबर १९६५ पर्यंत रुजू हप्ते भरलेल्या अशा होत्या. विमेदार १७ मे १९६५ रोजी मयत झालेला होता. विमेदाराने आपल्या पत्नीची नेमणूक नॉमिनी म्हणून केलेली होती आणि तिनेच आयुर्विमा कॉर्पोरेशनकडे ६५ हजार रुपयांचा हक्क दाखल केला होता. कॉर्पोरेशनने ही रक्कम देण्याचे नाकारले. विमेदाराने नव्या दोन पॉलिसी उतरताना पहिल्या पाच रद्द झालेल्या पॉलिसींची माहिती दिली नाही आणि अशा प्रकारे खरी परिस्थिती लपवून ठेवली म्हणून नव्या पॉलिसीची रक्कम देण्याची जबाबदारी कॉर्पोरेशनवर येत नाही असा युक्तिवाद करण्यात आला. हायकोर्टाने कॉर्पोरेशनचा युक्तिवाद करण्यात आला. हायकोर्टाने कॉर्पोरेशनचा युक्तिवाद मान्य केला व हक्क नाकारला.

## जवळच्या नातलगातील लैंगिक संबंधांचे दुष्परिणाम

अमेरिकेतील २० कोटी लोकांपैकी १ कोटी लोक जवळच्या नातलगांशी लैंगिक संबंध ठेवतात, असे मानसशास्त्रज्ञांच्या चाचणीवरून दिसून आले आहे. ह्या अंदाजापेक्षा प्रत्यक्ष वस्तुस्थिती अधिकच विदारक असून, एकूण लोकसंख्येच्या १० ते १५% लोक अशा लैंगिक संबंधांत गुंततात, असेही त्या चाचणीत म्हटले आहे. अशा संबंधातून निर्माण होणारी प्रजा विकृत असण्याचा संभव असतो, ह्यासाठी अशा संबंधांना सर्वच काळातील सर्वच समाज प्रतिबंध करीत असतात. अशा संबंधामुळे मानसिक विकृतीही निर्माण होत असते. अल्पवयीन मुलगी आणि वयात आलेला पुरुष (बाप, चुलता, भाऊ, इत्यादी) ह्यांच्यातील लैंगिक संबंध फारच हानिकारक ठरतो. अशा संबंधाचा कटू अनुभव येणारी मुलगी समाजाची बंधने तोडण्यास स्वाभाविकच उद्युक्त होते. असे लैंगिक संबंध समाजाच्या सर्व आर्थिक आणि शैक्षणिक थरांत आढळतात.

**सिनेमा दिग्दर्शकाला भोसकले**—बक्षीसिंग कर्तारसिंग ह्याने शक्ति सामंत ह्या सिनेमा दिग्दर्शक-निर्मात्याला एक पटकथा दिली, ती त्याने स्वीकारली नाही. त्यामुळे चिडून जाऊन कर्तारसिंगने शक्ति सामंतला अंधेरी येथील नटराज स्टुडिओच्या प्रवेशद्वाराजवळ भोसकले. आरोपीला स्टुडिओच्या कर्मचाऱ्यांनी पकडून पोलिसांच्या स्वाधीन केले. शक्ति सामंतांची रवानगी नानावटी इस्पितळात करण्यात आली.

इंजिन असो अगर इलेक्ट्रिक मोटार असो त्यांस "विजय" पंपाची आवश्यकता आहेच. विजय पंप विनातक्रार अखंड पाणीपुरवठा करतात.

कारखानदार—

न्यू विजय इंडस्ट्रीज लि.

विश्रामबाग—सांगली (महाराष्ट्र)

फोन : २३२ तार : Vijayplow

### कलकत्त्यामधील भुयारी रेल्वेविषयी रशियाला आस्था

कलकत्त्यामधील संकल्पित भुयारी रेल्वे बांधण्याविषयी रशिया आस्था दाखवू लागला आहे. ह्या मोठ्या कामासाठी येणाऱ्या सर्व-खर्चाची जबाबदारी रशियाने स्वीकारावी असा आग्रह भारताने धरला होता. त्यामुळे मध्यंतरी ही सर्व योजना बारगळल्या-सारखी वाटत होती. मुळात भुयारी रेल्वेची योजना रशियन तंत्रज्ञांच्या अहवालावरच आधारलेली होती. परंतु खर्चाचा प्रश्न आल्यावर अडचणी उत्पन्न झाल्या आणि इतर देशांकडून सहकार्य मिळविण्याचा विचारही करण्यात येऊ लागला. आता रशियाने पुढे केलेल्या अटींना अनुसरून उभय देशांत एक करार करण्याबद्दल एकमत झालेले आहे. रशिअन तज्ज्ञांनी तयार केलेला अहवाल नियोजन समितीला सादर करण्यात येईल. समिती त्याचा तपशीलवार विचार करून मंजुरी–नामंजुरी ठरवील. तोपर्यंत रेल्वेखाते ह्या अहवालाचा तपशील जाहीर करण्यास राजी नाही. अहवाल नियोजन समितीकडून रेल्वे खात्याकडे आल्यावर त्याला अखेरचे स्वरूप प्राप्त होईल. दरम्यान रशिआ आपल्या तज्ज्ञांचे एक मंडळ लवकरच भारताला पाठवीत आहे. कलकत्ता शहरातील वाहतूक व्यवस्था सुधारण्यासाठी बांधावयाच्या भुयारी रेल्वेसाठी १२० कोटी रुपये खर्च येणार असून ती पुरी होण्यास ६ वर्षे लागतील. डमडम ते टॉलिगंज असा हा मार्ग होईल. त्याची लांबी १६·५ किलोमीटर असेल आणि १ किलो-मीटरवर एक अशी १७ स्टेशन्स मार्गावर बांधावी लागतील.

---

### राजस्थानात आणखी दोन अणुविद्युत कारखाने

राजस्थानात कोटा येथील राणा प्रतापसागर धरणाजवळ अणुशक्तीच्या साह्याने वीज उत्पन्न करणाऱ्या कारखान्याची उभारणी करण्यात येत आहे. त्याची वीज उत्पादन करण्याची क्षमता २०० मेगॅवट इतकी असून येत्या मार्च अखेर उभारणीचे काम पुरे होईल असा अंदाज आहे. ह्या कारखान्यातील एका संचांत विजेचे चांचणी उत्पादन सुरूही करण्यात आले आहे. दुसऱ्या संचाची उभारणी पूर्ण होण्यास आणखी तीन वर्षांचा काळ लागणार आहे. दरम्यान आणखी दोन अणु विद्युत केंद्रे उभारण्याची शक्यता अजमावून पाहण्यात येत आहे. मध्यवर्ती जलशक्ती मंडळाचे काही तज्ज्ञ ह्या दृष्टीने पाहणी करण्यासाठी राणा प्रताप सागराला भेट देऊन आले. त्यांचे असे मत आहे की तेथील पाणी अणु विद्युत केंद्र उभारण्यास फारच चांगले आहे. अणु विद्युत केंद्रे उभारण्यासाठी जड पाणी लागते. अशा प्रकारचे पाणी निर्माण करण्याच्या कारखान्याच्या उभारणीचे काम चालू करण्यात आले आहे. संकल्पित कारखान्यात १०० टन जड पाणी निर्माण करण्यात येईल. त्याच्या उभारणीसाठी सुमारे ५३ कोटी रुपये भांडवल लागणार आहे. राज्यातील विजेची वाढती मागणी पुरविण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहेत. विजेच्या निर्मितीसाठी १० वर्षांचा एक कार्यक्रम आखण्यात आला आहे. त्यातील एक भाग म्हणून कोटा येथे ४४० मेगॅवट निर्मितीक्षमतेचे एक औष्णिक केंद्र उभारण्यात येण्याची शक्यता आहे.

---

### स्कूटर्सची वाढत जाणारी मागणी

उदयपूर येथे स्कूटर्स विकणाऱ्या एका दुकानापुढे १५ हजार लोकांनी ठाण मांडून आपली मागणी नोंदविण्याचा प्रयत्न केला. दुर्दैवाने जमलेल्या लोकांना शिस्त पाळण्याचे भान न राहून पोलिस बंदोबस्त असतानाही चेंगराचेंगरी होऊन १०-१५ जण मृत्युमुखी पडले. स्कूटर्सच्या वाढत्या मागणीचा हा विपर्यस्त पुरावाच म्हटला पाहिजे. भारतात अजूनही बैलगाड्यांना ग्रामीण भागात तरी महत्त्वाचे स्थान आहे. पण तेथेही आता सायकलीचे युग सुद्धा खूपच मागे पडू लागले आहे. महाराष्ट्रातील साखर-कारखान्यांच्या परिसरात फटफट्यांचा आवाज घुमू लागला आहे. बड्या बागाइतदारांच्या मोटारी व जीप्सही धावत असतात. पंजाबांत ट्रॅक्टर्सचा आवाज आता सर्वांना परिचित झाला आहे. सारांश, यंत्रयुगाच्या झपाट्यात देश वेगाने धावत आहे. तेव्हा वाहतुकीच्या छोट्या-मोठ्या साधनांची मागणी वाढत जावी ह्यात आश्चर्य वाटण्यासारखे काही नाही. मोठ्या शहरांतून तर स्कूटर्स–फटफट्यांची संख्या वेगाने वाढत आहे. १९७१ च्या प्रारंभी सुमारे ३ लाख, १० हजार स्कूटर्सची मागणी अर्जदारां-कडून नोंदविण्यात आली होती. परंतु ही मागणी पुरी होण्याची शक्यता नजीकच्या काळात दिसत नाही. सध्या देशातील स्कूटर्सचे वार्षिक उत्पादन ६० हजाराच्या जवळपास आहे. १९७४ च्या सुमारास स्कूटर्सची मागणी २ लाखाच्या घरांत जाईल अशी अपेक्षा आहे. भारत सरकारने सहा राज्य सरकारांच्या औद्योगिक मंडळांना नवे कारखाने काढण्याची परवानगी दिली आहे.

---

**मोटारींचे टायर्स दुर्मीळ**—मोटारींचे टायर्स (उत्तर भारतात ९००/२० आकाराच्या आणि दक्षिण भारतात ८२५/२० आकाराच्या) दुर्मीळ झाले असून सरकार त्यांच्या आयातीचा विचार करीत आहे. उत्पादनक्षमतेच्या फक्त ६० ते ७० % प्रत्यक्ष उत्पादन होत असल्यामुळे टायर्सचा तुटवडा निर्माण झाला आहे.

**अर्थ दिवाळी अंक, १९७१**

"अर्थ" चा ३७ वा वार्षिक दिवाळी अंक २० ऑक्टोबर रोजी प्रसिद्ध होईल. आमच्या हितचिंत-कांनी आपल्या जाहिराती सत्वर पाठवाव्या, अशी विनंती आहे.

द. रा. कुलकर्णी
व्यवस्थापक

### सोने सहज मिळण्याचा काळ अलीकडचा

आंतरराष्ट्रीय व्यापारात सोने महत्त्वाचे स्थान व्यापून बसलेले आहे. तथापि बाजारात सोने सहज मिळण्याचा काळ फारसा जुना नाही. ह्याचे कारण त्याचे उत्पादन फारसे होत नव्हते. अलीकडे प्रसिद्ध झालेल्या माहितीवरून १४९२ पासून १९७० पर्यंत ७३ हजार टन सोने खाणीतून काढण्यात आले. आधुनिक तेल वाहतुकीच्या एका बोटीत ते माऊ शकेल. अर्थात इतकी मोठी जबाबदारी वाहून नेण्यास विमा कंपन्या तयार होणार नाहीत. जोखीम पत्करावयाची तर ८०० कोटी डॉलर्सचा विमा उतरावा लागेल. गेल्या १००–१२५ वर्षांत सोने बाजारात केव्हाही मिळू लागले. त्या पूर्वी ते इतके सुलभतेने मिळत नसे. सोन्यावर आधारलेली आंतरराष्ट्रीय व्यापारी देवघेव पहिल्या महायुद्धापूर्वीच्या ५० वर्षांतच काय ती खऱ्या अर्थाने चालू होती. १८४८–४९ ह्या साली अमेरिकेत कलिफोर्निआ संघराज्यात सोने सापडू लागले; ते मिळविण्यासाठी लोकांची झुंबड उडाली. त्यापूर्वी सोने सहजासहजी मिळत नसे. अर्थातच सोन्यावर आधारलेली आंतरराष्ट्रीय व्यापाराची पद्धत व्यवहारात येणे शक्यच नव्हते. राजेरजवाडे संपत्तीचा साठा म्हणून ते जमवीत असत आणि सामान्य लोक दागिने करण्यासाठी त्याचा उपयोग करीत. सोन्याची नाणी पाडण्याचे प्रमाणही कमी होते. सोन्याऐवजी चांदीची व तांब्याची नाणी पाडण्यात येत असत.

---

### महत्त्वाच्या रेल्वेगाड्यांचा वेग वाढणार

परदेशातील–विशेषत: प्रगत देशांतील–रेल्वेगाड्यांचा वेग भारतामधील गाड्यांपेक्षा अधिक असतो. तेथील वाहतुकीची सर्वच यंत्रणा अधिक अद्ययावत असते. भारत आता ह्या दिशेने वाटचाल करू लागला आहे. महत्त्वाच्या रेल्वे मार्गांवर धावणाऱ्या गाड्यांचा वेग वाढविण्याचे प्रयत्न चालू आहेत. त्यातील एक भाग म्हणून दिल्ली ते कानपूर ह्या मार्गावर वेगाने पळणाऱ्या एका गाडीची चाचणी घेण्यात आली. गाडी दिल्लीहून सकाळी ७–१० वाजता निघाली ती कानपूरला ११–३० वाजता पोचली. ह्या गाडीने आपला प्रवास दर तासाला १६० किलोमीटर ह्या वेगाने केला. देशातील आणखी काही महत्त्वाच्या मार्गांवरील गाड्यांचे वेगही असेच वाढविण्यात येणार आहेत. अरुंद रुळांचे मार्ग रुंद रुळांचे करण्याचेही तत्त्वत: ठरविण्यात आले आहे.

---

**पेनीचे आणि तीन पेनींचे नाणे पदभ्रष्ट**—ग्रेट ब्रिटनमध्ये चलनाची दशमानपद्धती १ सप्टेंबर रोजी अमलात आली. आता पेनीचे आणि तीन पेनींचे नाणे कायदेशीर नाणे उरलेले नाही; १०० पेन्स=१ पौंड असे नवे कोष्टक आहे. नवा पेनी जुन्या पेनीच्या २·४ पट जास्त किंमतीचा पण आकाराने जवळ जवळ जुन्या पेनीच्या एवढाच आहे.

### तिरुपतीचे एका दिवसाचे उत्पन्न १ लाख ६५ हजार रु.

तिरुपती देवालयाला भक्तजनांपासून मिळणाऱ्या उत्पन्नासाठी एक हंडा ठेवलेला असतो. ता. २७ ऑगस्ट १९७१ ह्या एकाच दिवशी हंड्यांत जमा झालेल्या उत्पन्नाची रक्कम १ लाख ६५ हजार रु. इतकी भरली. त्या दिवशी हंडा उघडण्यात आला असता नेहमी देण्यात येणाऱ्या भेटींबरोबरच चलनी नोटांचे एक मोठे पुडके आत आढळून आले. वृत्तपत्राच्या कागदात नोटा व्यवस्थित गुंडाळण्यात आल्या होत्या. एकूण १ लाख, २० हजारांच्या नोटा होत्या. त्यातील १ लाख, १८ हजारांच्या नोटा १०० रुपयांच्या होत्या आणि बाकीच्या १० रुपयांच्या होत्या. एका दिवसाच्या उत्पन्नाचा हा बहुधा उच्चांक असावा.

---

### धनाढ्य अमेरिकन प्रवाशांची तारांबळ

प्रे. निक्सन ह्यांनी अमेरिकेच्या डॉलरला सावरून धरण्यासाठी उपाय जाहीर केल्यावर जगभर नाणे-बाजारात खळबळ उडाली. युरोपच्या सफरीवर गेलेल्या अमेरिकन प्रवाशांची तर तारांबळच उडाली. त्यांच्याजवळ असलेल्या डॉलर्सच्या बदली मिळणाऱ्या परदेशी चलनात घट झाली. युरोपमधील निरनिराळ्या प्रमुख शहरी अमेरिकन लोक हौसेने वस्तू विकत घेण्याऐवजी स्वत: जवळील वस्तू विकू लागले. लंडनमधील अमेरिकन वकिलातीसमोर एका अमेरिकन तरुणाने जवळची सतार ५० पौंडांसाठी विकण्यास काढली. त्याने ती दिल्लीत विकत घेतली होती. काही हौशी प्रवाशांनी कॅमेरे व रंगीत फिल्मही विकून टाकली.

---

### रणगाड्यांना रात्री पाहणारा डोळा

१९६५ मध्ये झालेल्या भारत-पाक युद्धात पाकिस्तानजवळ अमेरिकेने दिलेली युद्धसामग्री होती. ज्या अमेरिकन रणगाड्यांचा हिंदी सेनेने धुव्वा उडवला त्यात कुप्रसिद्ध पॅटर्न रणगाडेही होते. ह्या रणगाड्यांना रात्रीही दिसू शकणारे दिवे बसविण्यात आलेले होते. ह्या युद्धानंतर भारताने युद्धसाहित्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण होण्याचे प्रयत्न जारीने सुरू केले. 'विजयंता' ह्या रणगाड्याचे उत्पादन करण्यात येऊ लागले. आता त्याला रात्रीच्या अंधारात दृष्टी देणारा डोळा म्हणजे दिवाही देण्यात आला आहे. संरक्षण उत्पादन क्षेत्रात भारत यशस्वी प्रगती करीत आहे.

---

**रुपयावाल्या नोटांना वाढती मागणी**—मोठ्या किमतीच्या नोटा रद्द केल्या जातील ह्या भीतीने त्यांचे रूपांतर एक रुपयाच्या नोटांत करण्याची प्रवृत्ती वाढत आहे. त्यामुळे बँकांकडे नव्या रुपयावाल्या नोटांच्या बंडलांना खूप मागणी आहे. इतर नोटा रिझर्व्ह बँक प्रसृत करते; एक रुपयावाल्या नोटा अर्थखात्याच्या द्वारा प्रसृत होतात आणि त्यांना रुपयाच्या नाण्याचा कायदेशीर दर्जा आहे. त्यामुळे त्या नोटा धारण करणे अधिक सुरक्षित आहे अशी कित्येकांची भावना आहे.

## हेलिकॉप्टरची वाहतूक आतबट्ट्याची

हिंदमध्ये परदेशी प्रवाशांना आकर्षित करणारी अनेक रम्य स्थळे आहेत. परंतु त्या सर्वच ठिकाणी विमानाने जाण्याची सोय उपलब्ध नाही. कारण, त्यातील काही सौंदर्यस्थळे अतिशय दुर्गम अशा भागांत आहेत. ही गैरसोय दूर करण्यासाठी अशी दुर्गम ठिकाणे हेलिकॉप्टरच्या वाहतुकीने सुगम करावी अशी सूचना लोकसभेच्या एका कमिटीने केली होती. परंतु ही वाहतूक आर्थिक दृष्ट्या आतबट्ट्याची ठरेल असे आढळून आले आहे. हेलिकॉप्टर एक तास चालविण्यासाठी ३,२०० रुपये खर्च येतो तर तेवढ्याच अवधीत उत्पन्न मात्र जास्तीत जास्त १,७१० रुपये होते. इंडिअन एअर लाइन्सपेक्षा प्रवासाचा आकार दुप्पट धरूनही हीच अवस्था आहे. पाकिस्तान व नेपाळ ह्यांनाही ह्या बाबतीत असाच अनुभव आलेला आहे.

---

## अडचणीच्या निवारणातून नवी अडचण

सध्या सर्वत्र छोट्या नाण्यांची टंचाई भासत आहे. ती दूर करण्यासाठी टांकसाळीतून नवी नाणी पाडण्यात येणार आहेत. नव्या नाण्यांत १० पैशांची नाणीही आहेतच. परंतु ही नवी १० पैशांची नाणी वजनाने पहिल्या नाण्यापेक्षा हलकी असतील त्यामुळे सार्वजनिक टेलिफोन वापरणाऱ्यांची गैरसोय होणार आहे. नवी नाणी पेटीत टाकल्यावर कॉल मिळू शकणार नाही. म्हणून सार्वजनिक टेलिफोनवरील नाणेपेट्या नव्या नाण्याच्या वजनाशी जुळवून घेण्यात येणार आहेत. परंतु तोपर्यंत लोकांची गैरसोय होत राहील. एकट्या दिल्ली शहरातच १,००० सार्वजनिक टेलिफोन्स आहेत.

---

## प्राप्तिकराच्या थकबाकीची कसोशीने वसुली

प्राप्तिकर, संपत्तिकर, मालमत्ताकर, इत्यादींची सुमारे ५०० कोटी रुपयांची थकबाकी मार्च १९७२ पूर्वी वसूल करण्याचा आदेश मध्यवर्ती सरकारने कर वसुली खात्याला दिला आहे. २५,००० रुपयांपेक्षा कमी उत्पन्नाच्या कराची आकारणी करताना, सांगितलेले उत्पन्न अधिकाऱ्यांनी ग्राह्य धरावे; त्याची छाननी करण्यात वेळ घालवू नये, अशा सूचना देण्यात आल्या आहेत. इन्कम टॅक्स देणाऱ्या प्रत्येक पाचांपैकी चार जण २५,००० रु. पेक्षा कमी उत्पन्नाचेच असतात.

---

## नॅशनल बुक ट्रस्टलाही कागदाची टंचाई जाणवली

नॅशनल बुक ट्रस्टचा १९७०–७१ सालचा वार्षिक अहवाल प्रसिद्ध करण्यात आला आहे. अहवालात असे नमूद करण्यात आले आहे की संबंधित वर्षात देशात चांगल्या प्रतीच्या पुस्तकांना लागणाऱ्या कागदाची टंचाई होती. त्यामुळे संघटनेच्या प्रकाशनांच्या मार्गात फार मोठी अडचण उत्पन्न झाली. काही वेळा तर प्रकाशनांची संख्या कमी करावी काय असेही वाटू लागले.

---

## कारखान्यांतील रोजगार वाढले, पण बेकारांच्या संख्येतही वाढ झाली.

भारताच्या कारखानदारीच्या क्षेत्रात १९५१ ते १९६८ ह्या काळात रोजगारामध्ये दरसाल सुमारे ३% वाढ झाली म्हणजे, रोजगार २९ लक्षांवरून ४७ लक्षांवर गेला. कपास कापडाच्या गिरण्यात १,३५,००० अधिक लोकांना काम मिळाले. मोटार दुरुस्तीच्या रोजगारात ६९,००० ची भर पडली. ताग, दारूगोळा कारखाने, विडी कारखाने आणि चहा ह्यांतील रोजगार अनुक्रमे ६४,०००, ४०,०००, ३१,००० आणि ११,००० नी कमी झाला.

रोजगारात १८ लाखांची भर पडली तरी रोजगार हवा असणाऱ्यांच्या नोंदीतही त्यापेक्षा जास्त वाढ झालेली आहे. कारखान्यात एका नव्या कामगाराला काम उपलब्ध करून द्यावयाचे म्हणले तर त्यासाठी ३९ हजार रुपयांची भांडवल गुंतवणूक लागते आणि हा आकडा वाढतच चालला आहे.

कारखान्यांतील एकूण ४७ लक्ष कामगारांपैकी महाराष्ट्र, पश्चिम बंगाल, तामिळनाडू, गुजरात आणि उत्तरप्रदेश ह्यांत मिळून ६३% कामगार आहेत आणि त्याच राज्यांत अधिकाधिक रोजगार निर्माण होत आहेत.

---

## ब्रिटिश पार्लमेंटची कुमारी माता सभासद

बनडिट डेलव्हिन ह्या २५ वर्षाच्या महिलेने दोन बाबतींत वैशिष्ट्य मिळविले आहे; ती ब्रिटिश पार्लमेंटची सर्वांत तरुण सभासद आहे आणि ब्रिटिश पार्लमेंटच्या सभासदांतील पहिलीच कुमारी माता आहे. तिने नुकताच एका कन्येला जन्म दिला. अजूनही ती जनकाचे नाव सांगण्यास नकार देत आहे. वैयक्तिक आणि राजकीय जीवन ह्यांची घालमेल न करता ती एकमेकांपासून स्वतंत्र ठेवावीत, असे तिचे म्हणणे आहे. त्यामुळे राजकारणातून बाहेर पडण्याची तिला आवश्यकता वाटत नाही. "मी कुठल्याही इतर मातांप्रमाणेच आहे; माझी बेबी किती सुंदर आहे" असे ती सर्वांना सांगते.




---


## "शांतता राखू नका"

ऑगडेन ह्या अमेरिकन खेड्यातील ग्रंथालयाच्या ग्रंथपाल मिसेस जीनी फिप्स ह्यांनी आपल्या ग्रंथालयात "शांतता राखू नका" अशी पाटी लावली आहे! ग्रंथालयातील वातावरण फार गंभीर असल्यामुळे तेथे लोक येण्यास कचरतात असा तिचा अनुभव होता. आता कडेवर बालके घेऊनही स्त्रिया येऊ लागल्या आहेत आणि पुस्तकांची देवघेव वाढली आहे. ग्रंथालयात फक्त वाचनाला परवानगी पण संभाषणाला बंदी असेल तर तेथे जाण्यास बहुसंख्य लोकांना आवडत नाही, असे लोक आता तिच्या ग्रंथालयात जाऊ लागले आहेत.

---

# आमच्या बँकेत रिकरींग डिपॉझीट खाते उघडून तुम्ही हे सर्व मिळवूं शकता.



साऱ्या उपयुक्त गोष्टी. तुम्ही त्या मिळवू शकाल ? कां नाही ? त्याला मार्ग आहे. सर्वोत्तम बचत पद्धतीने नियमितपणे बचत करा. आमच्या बँकेत रिकरिंग डिपॉझिट खाते उघडा. यामुळं तुम्हाला जे हवे आहे ते मिळू शकते.

अधिक माहितीसाठी आमच्या कुठल्याही नजीकच्या शाखेला भेट द्या.

**बँक ऑफ महाराष्ट्र**

हेड ऑफीस : ११७७ बुधवार, पुणें २.

MAR 714



हे पत्र पुणे, पेठ शिवाजीनगर घ. नं.९१५/१ आर्यभूषण छापखान्यात, या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनी छापिले व 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना), पुणे ४, येथे प्रसिद्ध केले. (वार्षिक वर्गणी रु. ६)